दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २२६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२८ मार्च २०२५


**सुंदर सुविचार**

आपल्याला हवी असणारी गोष्ट मिळविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तीव्र इच्छाशक्ती.

## थोडक्यात

### 'त्या' युवकांची वाढली डोकेदुखी

**दि.२७, बुलडाणा :** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षण घेणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यासह राज्यातील लाखो युवकांसाठी हि बातमी आहे. बातमी उपयुक्त असली तरी काहीशी डोकेदुखी वाढविणारी आहे.

लाखो युवक, युवती सह शासकीय, निमशासकीय यंत्रणाची देखील डोकेदुखी याने वाढणार आहे. याचे कारण देखील मजेदार आहे. कधी कधी एखाद्या योजनेची शासन घोषणा करते, घाईघीसडीत अंमलबाजवणी करते आणि काही महिन्यांनंतर त्यात बदल करते. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना याचे मासलेवाईक उदाहरण ठरावे. मागील वर्षीच्या अखेरीस पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी व निवडणूक आचारसंहिता घोषित होण्यापूर्वी राज्य शासनाने हि योजना जाहीर केली. राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. तेंव्हा सहा महिने

या योजनेअंतर्गत उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी ६ महिने एवढा निश्चित करण्यात आला होता. मात्र आता राज्य सरकारचे शंभर दिवस झाल्यावर योजनेचा आढावा घेण्यात आला. यापरिणामी प्रशिक्षण कालावधी वाढविण्याय आला आहे. चालू म ार्च महिन्यात काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार उमेदवारांचा कार्य प्रशिक्षणाचा कालावधी हा पाच म हिन्यांनी वाढविण्यात आला! आता हा कालावधी एकूण ११ महिने करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र.बिटोडे यांनी याची पुष्टी केली आहे.

# लोकसभेत इमिग्रेशन विधेयक मंजूर होताच अमित शाहांचा घुसखोरांना इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, दिल्ली :** लोकसभेत इमिग्रेशन अँड फॉरेनर्स बिल, २०२५ मंजूर करण्यात आले आहे. यानंतर लोकसभेत झालेल्या चर्चेत भाग घेताना देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी महत्त्वाचे विधान केले आहे. शाह म्हणाले की, पर्यटक म्हणून किंवा शिक्षण, आरोग्य सेवा आणि व्यवसायासाठी भारतात येऊ इच्छिणाऱ्यांचे स्वागत करण्यास सरकार तयार आहे. पण जे धोका ठरू शकतात अशा लोकांविरोधात कठोर कारवाई केली जाईल यावर त्यांनी भर दिला.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार फक्त अशाच लोकांना रोखेल ज्यांचा भारताला भेट देण्याचा हेतू दूषित आहे. याबरोबरच त्यांनी देश हा धर्मशाळा नाही असेही वक्तव्य केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यावेळी केले. राष्ट्रीय सुरक्षेला धोका ठरतील अशांना देशात प्रवेश दिला जाणार नाही. देश म्हणजे 'धर्मशाळा' नाही. जर कोणी देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी देशात येत असेल तर त्यांचे नेहमीच स्वागत आहे, असेही शाह यावेळी म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की प्रस्तावित कायदा हा देशाच्या सुरक्षेला बळ देईल आणि यामुळे अर्थव्यवस्था आणि उद्योगांना बळ मिळेल. याबरोबरच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राला देखील



प्रोत्साहन मिळेल. तसेच इमिग्रेशन विधेयकामुळे भारत देशात येणाऱ्या प्रत्येक विदेशी व्यक्तीची ताजी माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल. म्यानमार आणि बांगलादेशातून आलेल्या रोहिंग्या आणि बांगलादेशी लोकांच्या भारतात बेकायदेशीर घुसखोरीच्या मुद्द्यावर देखील अमित शहा यांनी भाष्य केले. वैयक्तिक फायद्यासाठी भारतात आश्रय घेणार्या अशा लोकांचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे देश असुरक्षित झाला आहे असेही शहा म्हणाले. जर भारतात अशांतता निर्माण केली तर घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

या विधेयकामनुळे देशाची सुरक्षा बळकट होईल आणि यामुळे २०४७ पर्यंत भारत जगातील सर्वात विकसीत देश बनेल असेही गृहमंत्री म्हणाले. मी देशाला खात्री देऊ इच्छितो की आपल्या देशात येणार्या प्रत्येक परदेशी व्यक्तीची अप-टू-डेट माहिती आपल्याकडे असेल, असेही ते म्हणाले. भारताला पर्यटक म्हणून शिक्षणासाठी, आरोग्य सुविधांसाठी, आर अँड डी, व्यवसाय आणि अशाच काही कारणांसाठी भेट देऊ इच्छिणाऱ्यांचे मी स्वागत करतो. पण जे देशासाठी धोका ठरतील आम्ही त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवू आणि त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करू, असे शाह म्हणाले.

### अमित शहांची टीएमसीवर टीका

अमित शहा यांनी पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारवर टीका केली. बेकायदेशीर घुसखोरांवर कारवाई न केल्याची टीका त्यांनी पश्चिम बंगाल सरकारवर यावेळी केली. भारत-बांगलादेश सीमेवरील ४५० किमी लांबीचे कुंपण घालण्याचे काम प्रलंबित आहे कारण पश्चिम बंगाल सरकारने त्यासाठी जमीन दिली नाही, असेही शाह म्हणाले.

जेव्हा जेव्हा कुंपणाचे काम पूर्ण होते तेव्हा सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते गोंधळ करू लागतात आणि धार्मिक घोषणाबाजी केली जाते. ४५० किमीचे कुंपण घालण्याचे काम पूर्ण झाले नाही कारण बंगाल सरकार घुसघोरांवर दया दाखवत आहे, असे शाह म्हणाले.

# भरधाव ट्रॅव्हल व ट्रकची समोरासमोर भीषण धडक; १५ जखमी; दोन गंभीर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, चंद्रपूर :** प्रवासी वाहतुक करणाऱ्या ट्रॅव्हल्स व हायवा ट्रकमध्ये समोरासमोर झालेल्या धडकेत २ जण गंभीर जखमी तर १३ जण किरकोळ जखमी झाल्याची घटना आज सोमवार २७ मार्च रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास ब्रम्हपूरी नागभीड रस्त्यावरील पोदार स्कुलजवळ घडली आहे.

प्राप्त माहितीनुसार, नागपूर वरून ब्रम्हपूरीच्या दिशेने (एम.एच.४९ एटी ३०३० ) या क्रमांकाची प्रवासी वाहतूक करणारी ट्रॅव्हलस येत होती. या ट्रॅव्हल्स मध्ये ३० ते ३५ प्रवासी होते. ही ट्रॅव्हल्स चालक प्रचंड वेगाने



चालवत होता. तेव्हा ब्रम्हपूरी-नागभीड रस्त्यावरील पोद्दार स्कुलपर्यंत ही ट्रॅव्हल्स पोहचली तेव्हा ब्रम्हपूरी कडुन नागभीडच्या दिशेने (एम.एच.४० सीटी ५६९०) या क्रमांकाचा हायवा ट्रक जात होता.

अचानक या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाली.धडक इतकी भीषण होती की या धडकेत दोन्ही वाहनांचा समोरील भाग चेंदामेंदा झाला आहे. घटनेची माहिती मिळताच ब्रम्हपूरी पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत जखमींना ब्रम्हपूरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. व गंभीर जखमींना ब्रम्हपूरीतील खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. यात ट्रक चालक आदीत्य विशाल ठाकरे (२४) रा.मोहाडी ता.नागभीड हे गंभीर जखमी झाले आहेत. तर ट्रक मधील क्लिनर कुणाल मडावी (३०) रा.नागभीड किरकोळ जखमी आहे. तर प्रवासी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्स मधील गुड्डु गणपत धोंगडे (३७), जितेंद्र गेडाम (३४)रा.कुनघाडा चक ता.नागभीड, मुस्कान असल्म पठाण (२५)रा.नागभीड, दिपीका विनोद मत्ते (२९) रा.वर्धा, अजमल असल्म खा पठाण (३५) रा.नागभीड, चंद्रकला वामन ढोके (७०) रा.नागपुर, एकनाथ वामन गजभिये (४०) रा.बाम्हणी तह.चिमुर, कमल भास्कर ईलकटकल ( ७४) रा.इंदीरानगर नागपूर, सचिन वामन ढोके( ३२) रा.नागपुर, पवन मधुकर उराडे ( ३१) रा.चिमुर, सुनंदा भास्कर लोखंडे वय (२९)रा.रूई ता.ब्रम्हपुरी, निशांत सुखदेव मेश्राम (३९) रा.मुल अशी जखमींची नावे आहेत.

# शिळफाटा रस्त्यावरील कोंडीमुळे वाहतूक विभागाची मेट्रोला नोटीस





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२७, डोंबिवली (ठाणे) :** वाहतूक विभागाची परवानगी न घेता म ेट्रोच्या ठेकेदाराने मंगळवारी रात्री कल्याण शिळफाटा रस्त्यावरील मानपाडा चौक या वर्दळीच्या भागात मेट्रो मार्गाच्या कामासाठी रस्ता रोधक उभे केले. या रोधकांमुळे शिळफाटा रस्त्याला बुधवारी सकाळपासून वाहतूक कोंडीचा फटका बसला. शिळफाटा रस्त्यावर विना परवानगी रोधक उभे केल्याने मेट्रो कंपनीला नोटीस बजावण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पकंज शिरसाट यांनी बुधवारी माध्यमांना दिली.

मेट्रोच्या ठेकेदाराने मानपाडा चौकात उभारलेले आणि वाहतुकीला अडथळा ठरत असलेले विना परवानगीचे रस्ता रोधक जेसीबीच्या साहाय्याने बाजुला करण्यात आले. या रोधकाच्या बाजुला वाहतूक दर्शक खांब होता. दुहेरी मार्गिकेतील वाहतूक एका मार्गिकेतून सुरू झाली. यामुळे कोंडी झाली. वाहतूक विभागाची परवानगी न घेता हे रोधक उभे करून शिळफाटा रस्त्यावर वाहतूक कोंडी केली म्हणून मेट्रो कंपनीला नोटीस पाठविण्यात येणार आहे, असे उपायुक्त शिरसाट यांनी सांगितले.

मानपाडा चौकात रस्ता रोधक उभे केल्याने रात्रीपासून शिळफाटा रस्त्यावर मानपाडा भागात वाहतूक कोंडीला सुरूवात झाली होती. सकाळी शिळफाटा रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढल्याने मानपाडा चौक परिसरातील रस्ते वाहतूक कोंडीने गजबजून गेले. टाटा नाका, सोनारपाडा, काटई, वैभवनगरी पर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही मार्गिकांमध्ये वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

शिळफाटा रस्त्यावर अभूतपूर्व कोंडी झाल्याचे समजताच वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट, साहाय्यक पोलीस आयुक्त संजय साबळे शिळफाटा रस्त्यावर आले. कोळसेवाडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सकाळपासून मानपाडा चौक भागात झालेली कोंडी आपल्या वाहतूक पोलीस, सेवकांच्या म ाध्यमातून सोडवित होते.

रुग्णवाहिका, नोकरदार, शाळेच्या बस, पलावा, रुणवाल भागातील रहिवासी या कोंडीत अडकले. विनापरवानगी रोधक कोंडीला कारणीभूत असल्याने ते उपायुक्त शिरसाट यांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साहाय्याने बाजुला करण्यात आले. यामुळे वाहतुकीचा तयार झालेला फुगवटा कमी करण्यासाठी वाहतूक विभागाला दुपार झाली.

**महावितरणचा अडथळा...**

शिळफाटा रस्त्यालगत महावितरणचे खांब आहेत. या खांबांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे खांब स्थलांतरित करावेत म्हणून महावितरणच्या वरिष्ठांना कळवुनही त्याची ते दखल घेत नाहीत. आमच्याकडे निधी नाही, अशी त्यांची साचेबध्द उत्तरे असतात, अशी खंत उपायुक्त शिरसाट यांनी व्यक्त केली. महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांना संपर्क केला, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. शिळफाटा रस्ते बाधितांना अद्याप भरपाई दिली नाही. बाधित शेतकरी रुंदीकरण करून देत नाहीत. हे विषय पण मार्गी लागणे आवश्यक आहेत.

**शाळांना सुट्टी...**

शिळफाटा रस्त्यालगतच्या शाळांनी दुपारच्या सत्रातील विद्यार्थी कोंडीमुळे शाळेत वेळेत येणार नसल्याची शक्यता विचारात घेऊन दुपारच्या सत्राला सुट्टी जाहीर केली. सकाळच्या सत्रातील शाळा लवकर सोडल्या. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या मौखिक, विज्ञान, संगणक परीक्षा सुरू आहेत. त्या पुढे ढकलाव्या लागल्या, असे एका शाळा चालकाने सांगितले.

# खासगीकरणाविरोधात थाळीनाद आंदोलन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, मुंबई :** मुंबई महानगरपालिकेने पुर्नविकास केलेल्या वांद्रे येथील के. बी. भाभा रुग्णालयाची विस्तारित इमारत, बोरिवलीतील भगवती रुग्णालय आणि सावित्रीबाई फुले रुग्णालय, मुलुंडमधील एम. टी. अग्रवाल रुग्णालय, विक्रोळीतील क्रांतीज्योती महात्मा फुले रुग्णालय यांचा पुनर्विकास करून ती अद्ययावत करण्यात येत आहेत. मात्र रुग्णालये अद्ययावत करताना त्यांचे खाजगीकरण करण्यात येत असल्याने म्युनिसिपल मजदूर युनियनने गुरुवारी मुंबई महानगरपालिकेच्या शीव रुग्णालय, नायर दंत महाविद्यालय आणि क्षयरोग रुग्णालय येथे थाळीनाद आंदोलन करून मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या निर्णयाचा निषेध केला. ठाणे, पालघर, कल्याण, डोबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, पनवेल, पेण, वसई, नालासोपारा तसेच महाराष्ट्रातील विविध विभागातून गरीब रुग्ण मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येतात. या रुग्णांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा निशुल्क अथवा माफक दरात दिली जाते.

महानगरपालिकेच्या वांद्रे येथील के. बी. भाभा रुग्णालय, बोरिवलीतील भगवती रुग्णालय आणि सावित्रीबाई फुले रुग्णालय, मुलुंडमधील एम. टी. अग्रवाल रुग्णालय, विक्रोळीतील क्रांतीज्योती महात्मा फुले रुग्णालयातील वैद्यकीय सेवा अपुरी पडत असल्यामुळे किंवा काही रुग्णालये मोडकळीस आल्यामुळे त्यांचा पुनर्विकास करण्यात येत आहे. मात्र हा पुनर्विकास करताना रुग्णालयांचे खासगीकरण करण्याचा घाट मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घातला आहे. शिवडी येथील क्षयरोग रुग्णालय, सांताक्रुझमधील व्ही. एन. देसाई रुग्णालयामधील स्वयंपाकघर खाजगी ठेकेदाराला दिले आहे. त्याचप्रमाणे काही रुग्णालयांतील रक्तपेढी, अतिदक्षता विभाग खाजगी संस्थांना चालविण्यासाठी दिले आहेत. या रुग्णालयांप्रमाणे अन्य रुग्णालयांचे खाजगीकरण झाल्यास नागरिकांना अद्ययावत, निःशुल्क अथवा माफक दरात मिळणाऱ्या वैद्यकीय सेवांपासून वंचित रहावे लागणार आहे. त्यांना खाजगी रुग्णालयांप्रमाणेच महागडे उपचार घेण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. तसेच रुग्णालयांमध्ये अनेक वर्षांपासून रुग्ण सेवा देत असलेल्या कर्मचाऱ्यांना इतरत्र पाठविण्यात येत आहे किंवा त्यांची पदे खंडित करण्यात येत आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात येण्याची शक्यता आहे. मुंबई महानगरपालिकेचा हा निर्णय कामगार विरोधी असल्यामुळे कर्मचाऱ्यांसह नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली असून, हा निर्णय मागे न घेतल्यास त्याचा उद्रेक होण्याची शक्यता आहे.




## शितावरून भाताची परीक्षा

न्यू इंडिया को ऑप. बँकेवर गेल्या महिन्यात (फेब्रुवारी २०२५) रिझर्व्ह बँकेने कलम ३५ ए अंतर्गत निर्बंध लादले. त्यामुळे माध्यमांतील काहींनी, संपूर्ण सहकारी बँकिंग क्षेत्राच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सारासार विचार न करता, सहकारी बँकांवर टीका करणे सोपे आहे कारण त्या सॉफ्ट टार्गेट आहेत, त्यांना कोणी वाली नाही, त्यांचा कोणताही दबाव गट नाही. घोटाळा करणाऱ्या कोणत्याही बँकेचं, कर्मचाऱ्यांचं समर्थन कोणीही करू शकत नाही. तसा या लेखाचा उद्देशही नाही. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये हजारो कोटींचे घोटाळे होऊनही त्या बँकांवर बँकिंग नियमन कायदा ३५ ए ची कारवाई करण्यात आलेली ऐकिवात नाही. फार तर त्या बँकांवर पी.सी.ए.) अंतर्गत देखरेख ठेवण्यात आली. पण त्याबाबत जनतेत घबराट पसरवणाऱ्या बातम्या माध्यमातून देण्यात आल्या नाहीत, कारण एकच, या बँकांना सरकारचं संरक्षण आहे. कल्पना करा, या बँकांना सरकारचं संरक्षण नसतं तर? या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक ट्रेंड ॲण्ड प्रोग्रेस रिपोर्टमधील सहकारी बँकांची माहिती उद्धृत करण्याचा हा प्रयत्न. रिझर्व्ह बँकेने भारतातील सर्व बँकांबाबत तसेच नॉन बँकिंग कंपन्यांविषयी सविस्तर माहिती देणारा अहवाल अलीकडेच प्रसिद्ध केला आहे. त्यात खासगी, व्यापारी, सहकारी बँकांची तसेच नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांची ३१ मार्च २०२४ अखेरची व ग्रामीण सहकारी संस्थांची तुलनात्मक आर्थिक स्थिती प्रसिद्ध केली आहे. त्यातील नागरी सहकारी बँकांविषयीची माहिती सर्व संबंधितांना व्हावी यासाठी हा लेखन प्रपंच.

व्यवसाय मिश्रण


रिझर्व्ह बँकेच्या या अहवालानुसार देशभरात १४७२ नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. या बँकांमध्ये एकूण ५,५५, ४६९/- कोटी रुपयांच्या ठेवी असून ३,४६,९०३/- कोटी रुपयांची कर्जे त्यांनी वितरित केली आहेत. या बँकांकडे एकूण ७,०७,६६९ कोटी रुपयांची मालमत्ता शिल्लक आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंदात ४ ची वाढ दिसत आहे. या सहकारी बँकांच्या ठेवींमध्ये मार्च, २०२४ अखेर ४ वाढ झाली असून, सप्टेंबर २०२४ अखेर ४.४ ची वाढ झाल्यामुळे, ठेव वाढीचे सातत्य दिसत आहे. सहकारी बँकांनी त्यांच्या ग्राहकांना दिलेल्या कर्जांमध्ये मार्च, २०२४ अखेर ५ ची वाढ झाली असून, सप्टेंबर २०२४ अखेर हाच वाढीचा वेग ६.२ नोंदवला आहे. व्यापारी बँकांच्या ठेवींमध्ये मार्च, २०२४ अखेर १३.४ ची वाढ झाली असून कर्जांमध्ये १६ वाढ झाली आहे. व्यापारी बँकांच्या देशभर असलेल्या शाखांची संख्या १,६०,००० हून अधिक असून, त्या तुलनेत सहकारी बँकांच्या शाखांची संख्या फक्त २३,१०० आहे. देशभर शाखांचे जाळे, तसेच व्यवसाय प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हे बँकांच्या प्रगतीचे वैशिष्ट्य आहे.

सहकारी बँकांच्या ठेवी व कर्जांचे गुणोत्तर ६२.५० तर व्यापारी बँकांच्या बाबतीत हेच गुणोत्तर ७६.८० आहे. सहकारी बँकांनी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण फक्त ०.८ असून व्यापारी बँकांच्या बाबत हेच प्रमाण ९ आहे. सहकारी बँकांच्या गुंतवणुकीतील वाढ सातत्यपूर्ण आहे. सहकारी बँकांची एकूण गुंतवणूक १,९३,८१४/- कोटी रुपये आहे. ९० सहकारी बँकांची गुंतवणूक, वैधानिक तरलता प्रमाणपत्रांमध्ये आहे, तर व्यापारी बँकांचे हेच प्रमाण ८३ आहे. अनुत्पादित कर्जांचे प्रमाण

ढोबळ अनुत्पादित कर्जांच्या प्रमाणावर बँकांच्या कर्जाची गुणवत्ता ओळखता येते. सहकारी बँकांमध्ये गेली तीन वर्षे सातत्याने ढोबळ अनुत्पादित कर्जाच्या गुणोत्तरात सुधारणा दिसून येत आहे. गतवर्षी (मार्च २०२३) ८.८ असलेले ढोबळ अनुत्पादित कर्जाचे गुणोत्तर मार्च २०२४ अखेर ७.३ झाले आहे. तर नक्त अनुत्पादित कर्जांचे गुणोत्तर २.२ वरून १.२ झाले आहे. त्यामुळे तरतुदींचे गुणोत्तर ७७.१ वरून ८४.६ वर पोहोचले आहे.

# सीलबंद पाणी विकणाऱ्या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का ?

लहानपणी शाळेत मराठी व्याकरण शिकवले जात असे ज्यामध्ये सामान्य नाम आणि विशेष नाम असे नामाचे दोन प्रकार सांगितले जात. एकाच जातीच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला मिळालेले नाव म्हणजे सामान्य नाम तर एकाच जातीच्या विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध करते त्या नावाला विशेष नाम असे म्हणतात. ही झाली व्याकरणातील व्याख्या. दैनंदिन जीवनात व्यवहारात उपयोगी पडणारी काही अशी विशेष नाम आहेत जी त्यांच्यातील गुणवत्तेमुळे आणि ग्राहकांच्या पसंतीमुळे सामान्य नाम बनून आज लोकांच्या ओठी रुजली आहेत. उदाहरणच द्यायचे तर ग्रामिण भागात (काही शहरी भागांतसुद्धा) अंगाचा साबण हवा असेल तर 'लाईफबॉय द्या' अशी मागणी ग्राहकांकडून केली जाते, अर्थात दुकानदाराला हे ज्ञात असल्याने तो ग्राहकांना त्याच्याकडे असलेला कोणताही अंगाचा साबण ग्राहकाला देतो आणि ग्राहकही तो आनंदाने स्वीकारतो. अशाच प्रकारे टूथपेस्ट म्हणून 'कोलगेट' मागितली जाते, भांड्यांचा साबण म्हणून 'विम बार' मागितला जातो. याच विशेष नामांतून सामान्य नाम झालेल्या उत्पादनांच्या यादीत आणखी एक नाव येते ते 'बिस्लेरी'चे. बिस्लेरी कंपनीने १९८४ मध्ये सर्वप्रथम सीलबंद फिल्टर्ड पाण्याची प्लास्टिक बाटली विक्रीसाठी आणली तेव्हा कोणाला वाटलेही नव्हते कि पाणी बाटल्यांत भरून विकण्याची संकल्पना भविष्यात जनसामान्यांत इतकी रुजेल की त्याहून जगणे मुश्किल होऊन जाईल. आज सीलबंद बाटल्यांची लोकांना इतकी सवय जडली आहे की बाहेर उपहारगृहात जेवताना किंवा काही अन्नपदार्थ खाताना उघड्यावरील विनामूल्य पाणी पिऊन पोटाला त्रास करून घेण्याऐवजी लोक २० रुपयांची एक लिटरची सीलबंद पाण्याची बाटली विकत घेणे पसंत करतात. पूर्वी प्रवासाला जाताना लोक घरातून पाण्याचे कॅन अथवा बाटल्या भरून घेऊन जात. आता असा त्रास कोणी करताना दिसत नाही. हल्ली स्थानकांवरच नव्हे तर तर चालत्या ट्रेनमध्ये आणि बसमध्येही थंडगार फिल्टर पाण्याची बाटली सहज उपलब्ध होऊ लागली आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत. गेल्या काही दिवसांत उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला आहे. शरीरातून घामावाटे जाणाऱ्या पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी लोक सीलबंद पाणी मोठ्या प्रमाणात विकत घेऊ लागले आहेत. आजमितीला केवळ शीतपेयाच्या दुकानांत किंवा उपहारगृहांतच नव्हे तर महामार्गाच्या ठिकाणी पानाच्या टपरीवर, फळांच्या आणि भाज्यांच्या दुकानांतूनही सीलबंद पाण्याच्या बाटल्या विकल्या जाऊ लागल्या आहेत. उन्हाने जीव कासावीस झालेला असताना या थंडगार सिलबंद पाण्याचा एक घोट जरी घशाखाली उतरला तरी स्वर्गीय सुखाचा अनुभव येतो.



सीलबंद पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्याही गावोगावी तयार होऊ लागल्या आहेत. पारदर्शक प्लास्टिक बाटलीत पाणी भरून त्यावर सील असलेले बूच लावले आणि त्यावर कंपनीचे लेबल चिकटवले कि ती बाटली २० रुपयांना कोणीही विकत घेतात. ज्या बिस्लेरी कंपनीने या सीलबंद पाण्याची संकल्पना लोकांमध्ये रुजवली त्या बिस्लेरी पाण्याच्या बाटल्या आज पाहायला मिळणेही दुरापास्त झाले आहे. बिस्लेरी मागितल्यावर आज दुकानदाराकडून सीलबंद पाण्याची कोणत्याही कंपनीची बाटली हाती थोपवली जाते. या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का ? यांच्या पाण्याची गुणवत्ता शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने तपासलेली असते का ? यांच्याकडे त्याबाबतचे प्रमाणपत्र असते का ? एसटीने प्रवास करताना दर दोन गावांच्या नंतर वेगळ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली पाहायला मिळते. लांबच्या प्रवासात रेल्वे डब्यात पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्यांकडेही अशाच वेगवेगळ्या कंपन्यांच्या पाण्याच्या बाटल्या दिसून येतात. यामध्ये भरले गेलेले पाणी शासनाने नेमून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार शुद्ध केलेले असते का ? सीलबंद २० लिटर पाण्याच्या बाटला बाबतही तीच परिस्थिती आहे. आजमितीला अनेक कंपन्या, आस्थापने आणि कार्यालये यांमध्ये कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याचे २० लिटरचे बाटले मागवले जातात. रिकामे झालेले बाटले वॉटर सप्लायर्स घेऊन जाऊन दुसऱ्या दिवशी त्याच बाटलांमध्ये पाणी भरून आणतात. ८० ते १०० रुपये प्रति बाटला दराने भरून आणलेले हे पाणी शुद्धीकरण प्रक्रिया करून आणलेले असते कि थेट नगरपालिकेच्या नळातून भरलेले असते याची खात्री कोण करतं ? पुन्हा पून्हा वापर केला जाणाऱ्या या बाटलांना काही वेळा खालून शेवाळे लागलेले पाहायला मिळते, हे बाटले किती वेळा वापर केल्यावर नष्ट करावेत याबाबत सीलबंद पाणी विकणाऱ्या आणि खरेदी करणाऱ्यांना माहिती असते का ? आज भ्रष्टाचार दिल्लीपासून गल्लीपर्यंत मुरला आहे. सीलबंद पाण्याच्या बाटल्या बनवणाऱ्या कंपन्या याबाबतीत मागे राहतील का ? ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना दिले जाणारे पाणी शुद्ध नसेल, तर ती केवळ ग्राहकाची फसवणूकच नव्हे, तर ग्राहकाच्या आरोग्यालाही अपायकारक ठरू शकते. सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसांत तहान लागल्यावर आपण जवळपास कुठे थंड पाण्याची बाटली विकत मिळते का ते शोधू लागतो. मिळाल्यावर ती कुठल्या कंपनीची आहे, त्या बाटलीवरील लेबलवर ट्रेडमार्क आहे का ? बाटलीवर एक्सपायरी डेट लिहिलेली आहे का ? लिहिली असल्यास ती उलटून तर गेली नाही ना ? पाणी विकणारी कंपनी शासनमान्य आहे का याबाबत कोणतीही खात्री न करता आपण तिचे बूच उघडून ती तोंडाला लावतो, हे आपण जागरूक ग्राहक नसल्याचेच लक्षण आहे. आरोग्य राखण्यासाठी घेतलेली पाण्याची बाटली आरोग्य बिघडवणारी ठरू नये यासाठी प्रत्येकाने सतर्क राहायला हवे. दिवाळी जवळ आली कि शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे अधिकारी ठिकठिकाणी मिठाईच्या उत्पादकांवर धाडी मारून माव्याची तपासणी करतात. नकली मावा तयार करणाऱ्यांवर कारवाई करतात अशाच प्रकारची तपासणी उन्हाळयाच्या दिवसांत सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्यांच्या कारखान्यांमध्येही करायला हवी !

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**

# भेसळखोरांना रोखा



पनीर पासून तयार करण्यात आलेले डिशेस सर्वचजण चवीने खातात. लहान मुलांना तर पनीर खूपच आवडते. मात्र ह्याच सर्वांच्या आवडत्या पनीर मध्ये भेसळ होत असल्याची आणि राज्यभरात विकले जाणारे पनीर बनावट असल्याचा मुद्दा श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभेत मांडला. राज्यात विकले जाणारे पनीर बनावट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होतीच आमदार साहेबांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी केली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आमदार पाचपुते साहेब तसेच भेसळ खोरांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांचे मनापासून आभार! बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळ खोरांनी उच्छाद मांडला आहे. राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहे. एक लिटर दुधात काही रासायनिक पदार्थ टाकून वीस लिटर दुध बनवण्याचे प्रकार सुरू आहे. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातच दूध भेसळीचे रॅकेट उघडकीस आले होते.

दौंडमध्येही म्हशींनी अधिक दूध द्यावे यासाठी त्यांना प्रतिबंधक इंजेक्शन दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केवळ दुधातच नव्हे तर मिठाईमध्येही भेसळ केली जात आहे. मिठाई बनवताना वापरण्यात येणाऱ्या खव्यामध्येही भेसळ असल्याच्या अनेक घटना राज्यात उघडकीस आल्या आहेत.

बर्फी किंवा खवा दुधापासूनच बनतो अशी सर्वसामान्यांची धारणा असते. फराळाचे पदार्थ बनवण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. लहान मुलांना हे खव्यापासून तयार केलेले पदार्थ खूप आवडतात. त्याला मागणीही जास्त असते त्यामुळेच वर्षानुवर्षे पडलेली दुधाची पावडर, स्टार्च, वनस्पती तूप, दूध याबरोबरच काही प्रमाणात रसायन मिसळून तयार केलेला निकृष्ट खवा भेसळखोर बाजारात खवपीत आहेत. काही भेसळखोर दर्जेदार खाद्यान्नाच्या ब्रॅण्डसशी साम्य असणारे बनावट, कमअस्सल तब्येतीला घातक पदार्थ सारख्याच दिसणाऱ्या वेष्टनातून विकत आहेत. हे पदार्थ शहरातील प्रश्नार्थक वातावरणात बनवले जातात.

हे पदार्थ रस्त्यांवर कुत्री मांजरी फिरण्याच्या ठिकाणी वाळत घातलेले दिसतात. भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दुध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते शिवाय उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षांत देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉईजन आहे.

हे स्लो पॉईजन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाज कंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. ही भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची अर्थात एफ डी ए ची आहे. ते त्यांची जबाबदारी पार पाडतही आहे त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या नवी मुंबई परिमंडळ २ ला अलीकडेच नवी दिल्लीच्या ईट राईट इंडियाच्या उपक्रमात सहभागी होऊन २०२२ - २३ साठीचे पाच लाखांचे पारितोषिक अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचकडून प्राप्त झाले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच मात्र एफ डी आयच्या कारवाईत सातत्य नाही. कारवाईत सातत्य नसल्यानेच भेसळखोरांना त्यांची भीती वाटेनाशी झाली आहे. एफ डी आय चा वचक नसल्यानेच राज्यात भेसळखोरी वाढली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दूध आणि खाद्य पदार्थातील भेसळखोरी रोखण्यासाठी पोलीस आणि एफ डी ए ने एकत्र येऊन राज्यभरात धडक मोहीम राबवायला हवी. कमी श्रमात अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळखोरांना थेट फाशीचीच शिक्षा द्यायला हवी.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## प्रवाशयांच्या सुलभतेसाठी १५ एप्रिल ते १५ जून उन्हाळी जादा बसेस



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, भंडारा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा विभागाच्या वतीने १५ एप्रिल ते १५ जून २०२५ पर्यत जादा उन्हाळी बसेस सोडण्यात येत आहे. या कालावधीत भंडारा, गोंदिया, साकोली, तुमसर, तिरोडा व पवनी बस स्थानकावरुन खालील प्रमाणे अतिरिक्त जादा वाहतुकीचे नियोजन करण्यात आलेले आहे.

भंडारा ते राजुरा जाताना ८.३० वाजता येतांना १४.३० वाजता आहे. व भंडारा, तुमसर, हिंगणघाट जाताना १५.२० वाजता येतांना ६.१५ वाजता आहे. भंडारा परतवाडा जातांना ७.२० वा. येताना १४.३० वाजता व भंडारा ते यवतमाळ जाताना ९ वाजता ते येताना १५.०० वाजता. तुमसर ते अमरावती जातांना ७.४५ वाजता व येताना १४.०० वाजता आहे. तसेच तुमसर ते वर्धा जातांना ७.१५ वाजात आहे. तर येताना १२.१५ वाजता आहे. व तुमसर ते चंद्रपूर जातांना ७ वाजता आहे. तर येतांना १३.३० वाजता आहे. तिरोडा ते अमरावती जाताना ६.३० वाजता आहे. तर येताना १३.३० वाजता आहे. तिरोडा ते अमरावती जाताना ७.३० वाजता आहे. तर येताना १४.३० वाजता आहे.

वरिल प्रमाणे उन्हाळी जादा हंगामाकरिता फेऱ्या प्रवासी वर्दळ पाहून टप्पा टप्प्याने सुरु करण्यात येणार असून त्यानुसार या फेऱ्या संगणकीय आरक्षण प्रणालीवर व रिझर्वेशन उपलब्ध राहतील. तसेच प्रवासी गर्दीचा प्रतिसाद बघून बसस्थानकावरुन शिवशाही, निम आराम, साधारण बसेस वेळोवेळी नागपूर मार्गावर अतिरिक्त बसेस सोडण्यात येणार आहे. तरी सर्व प्रवासी बांधवानी उन्हाळी जादा हंगाम २०२५ करीता लावण्यात येणाऱ्या बसेसचा वापर करण्याकरीता राज्य परिवहन महामंडळ भंडारा विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे. तरी सर्व प्रवासी बांधवानी अवैध प्रवासी वाहनाने प्रवास करणे टाळून राज्य परिवहन महामंडळास सहकार्य करावे असे विभाग नियंत्रक भंडारा यांनी कळविले आहे.

# विक्रमगडमध्ये 'खावडा फोर सी' प्रकल्पावरून तणाव

## आदिवासींच्या जमिनीवर बेकायदेशीर हस्तांतरणाचा आरोप

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२७, पालघर :** विक्रमगड तालुक्यातील कुर्झे गावात खावडा फोर सी या विद्युत वाहिनी प्रकल्पासाठी आदिवासींच्या कुळ संरक्षित जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण करून जमीन सपाटीकरण सुरू करण्यात आले आहे. ग्रामसभेच्या परवानगीशिवाय हा प्रकार घडत असून, स्थानिक आदिवासींनी या अन्यायाविरोधात तीव्र विरोध दर्शवला आहे. सदर कुर्झे गाव हे पेसा (झएडअ) कायद्यांतर्गत येते, त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या जमिनीच्या हस्तांतरणासाठी ग्रामसभेची संमती आवश्यक आहे. मात्र, या प्रकल्पासाठी ग्रामसभेची कोणतीही मंजुरी घेतलेली नाही.

त्यामुळे हा कायद्याचा स्पष्ट भंग आहे.कुर्झे दुमाडपाडा,कारेलपाडा, व गवळीपाडा येथील ग्रामस्थांचा विरोध असून माडपाडा, कारेलपाडा व गवळीपाडा या गावाचे श्ध्दा स्थान ह्या जमिनीमध्ये असलेल्या पारंपारिक बिगर आदिवासी लोक अतिक्रमण करण्याच्या प्रयत्न करीत आहेत.

मात्र ग्रामस्थांनी या अन्यायाविरोधात आवाज उठवताच कंपनी व्यवस्थापनाने पोलिसांचा गैरवापर करून स्थानिक आदिवासींवर खोटे गुन्हे दाखल केले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे आदिवासींच्या पारंपरिक देवस्थान, कुंळाचे दुरुंग आणि धार्मिक स्थळे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत, असेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

त्यामुळे ग्रामस्थ आक्रमक झाले असून तीव्र आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.तसेच अन्यायाविरोधात लढण्याचा निर्धार केला असून त्वरित प्रशासनाने हा प्रकार रोखावा आणि संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. जर प्रशासनाने वेळीच दखल घेतली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

**काय प्रकरण आहे नेमके?**

खावडा फोर सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड ही कंपनी आंतर-राज्य पारेषण योजनेअंतर्गत खावडा फोर, पार्ट सी पॉवर ट्रान्समिशन प्रकल्प विकसित करत आहे. हा प्रकल्प गुजरात राज्यातून हरित ऊर्जा प्रसारित करून महाराष्ट्र राज्याला पुरवण्यात आणि राज्याची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी भविष्यातील विजेची मागणी आणि स्वस्त आणि हरित वीज उपलब्ध करून देऊन स्थानिक समुदायाला सक्षम बनविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. राज्याच्या आणि विशेषतः मुंबई महानगर प्रदेशामधील वेगाने वाढणाऱ्या विजेच्या मागणीची पूर्तता करून ते महाराष्ट्रातील ऊर्जेच्या पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय वाढ करेल. या प्रकल्पात एक सबस्टेशन आणि चार पारेषण वाहिन्या अंतर्भूत आहेत. यासाठी कुर्झे येथील जवळपास १०० एकर च्या आसपास जागा संपादीत केली जाणार मात्र या जमिनीमधील काही जमीन ही आदिवासी संरक्षित कुळाचे आहे. या जमिनी मध्ये आदिवासी ची पूर्वीपासून ग्रामदैवत असून त्यांच्या कब्जात जागा आहे. मात्र या जमिनीमध्ये कागदोपत्री हेराफेरी करून खाजगी मालकांनी जागा बळकावून कंपनीच्या घशात घालण्याचे काम काहीतरी लोकांनी केल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.



कुर्झे दुमाडपाडा लगत असणाऱ्या आदिवासी कुळ जमीनीवर गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी च्या कब्जात होत्या. या जमिनीवर आदिवासी चे गावदेवी, तसेच काही कुळांचे दुरुंग ही श्द्धा पारंपारिक देवस्थानआहे. ग्रामस्थ व ग्रामसभेचे पूर्ण विरोध असून ही खावडा फोर सी ही खाजगी कंपनी ही जागा बळकावत आहे.
**- अमोल काटकरी (सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ कुर्झे)**

## नवी मुंबईतील नगरसेविकेने पंढरपुरातील पाणी वाचविले



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२६, जुईनगर (नवी मुंबई) :** नवी मुंबई जुईनगर प्रभागाच्या माजी नगरसेविका तनुजा मढवी आपल्या नातलग व मैत्रिणींसोबत पंढरपूर येथे गेल्या होत्या. तेथील पुंडलिक भक्ती निवास मध्ये त्या थांबल्या होत्या. सकाळी बाहेर फेरफटका मारताना त्यांना कुठेतरी पाणी वाहत असल्याचा आवाज आला. त्यांनी ते ठिकाण शोधले. एक नळ कोणीतरी चालूच ठेवून गेला होता. त्याला कॉक नव्हता फक्त स्टॉपर होता. सदर वाहणारे पाणी त्यांनी मॅनेजमेंटला सांगून बंद करायला लावले.

एकेकाळी पालिकेत उपसभापती पाणी पुरवठा या पदावर असल्याने नगरसेविकेच्या मनाला पाणी वाया घालवणे पटले नाही व त्यांनी लगेच ॲक्शन मोडमध्ये येऊन वाया जात असणारे पाणी बंद करायला लावून आपली जबाबदारी पूर्ण केली. पाणी हे अनमोल आहे, पाण्याला जीवन असे नाव आहे, पाण्याशिवाय जिवन नाही. ज्यांना पाणी मिळत नाही. त्यांना पाण्याचे मोल विचारून पहा. आपण शहरांमध्ये सहजपणे पाणी वाया घालवितो. तनुजा मढवी यांनी केलेले काम अगदी न सांगण्यासारखे लहान असले तरीही ते इतरांना मोलाचा संदेश देणारे मोठे कार्य आहे. त्यांनी केलेल्या कार्याला सॅल्यूट.

# उष्णतेच्या लाटेमध्ये पिकांचे व्यवस्थापन; कृषि विभागामार्फत उपाययोजना जाहिर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** उन्हाळाच्या कालावधीत उष्माघात व उष्णतेच्या लाटेमुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पिक व्यवस्थापन करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याअनुषंगाने कृषि विभागामार्फत उपाययोजनसबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केले आहे. या मार्गदर्शक सूचनाचे शेतकऱ्यांनी अवलंब करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाचे कृषि उपसंचालक अनुराधा गावडे यांनी केले आहे.

**कृषि विभागाने निर्गमित उपाययोजना :-**

उन्हाळ्यातील भूजल पातळी खालावते म्हणून शेतकऱ्यांनी पिकांना ओलीत करतेवेळी पाण्याचा अपव्यय होणार नाही अशा पध्दतीने पाणी द्यावे. फळबाग, भाजीपाला या पिकांना ओलीत करताना प्राधान्याने ठिबक किंवा तुषार सिंचन पध्दतीचा वापर करावा. ज्यामुळे पाण्याची बचत होण्यास मदत होईल. पिकांना सिंचनासाठी आवश्यक तितक्याच पाण्याचा वापर करावा, कारण उन्हाळ्यात भूजल पातळी खालावलेली असते. सध्याच्या हवामान परिस्थितीत पिकाला पाण्याचा ताण बसू नये, म्हणून ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. कोरडे हवामान, उच्च तापमान लक्षात घेता सुर्यफुल पिकाला वाढीच्या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास उत्पादनात लक्षणीय घट येऊ शकते. म्हणून पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे.

कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअसच्यावर गेल्यास लिंबू झाडांची वाढ कमी व्हायला सुरुवात होते. त्यामुळे ठिबक सिंचनाने ४ ते ५ दिवसांच्या अंतराने लिंबू बागेला ओलीत करावे. उष्णतामानाचा केळी बागेवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून बाष्पीभवन रोखण्यासाठी केओलीन बाष्परोधक ८० ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात २० ते ३० दिवसांच्या अंतराने दोन ते तीन वेळा फवारावे. सध्याच्या वाढत्या तापमानामुळे परिपक्व झालेली वांगीची प्रत खराब होऊ शकते.

म्हणून शक्यतो ताबडतोब परिपक्व वांगी काढून त्याची प्रतवारी करावी व ती वांगी बाजारपेठेत विक्रीस पाठवण्याची व्यवस्था करावी. उन्हाळ्यातील ३७ओ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त असलेले कमाल तापमान व कमी झालेली आर्द्र पेरू फळबागेतील फळधारणा योग्य रीतीने होण्यास बाधक ठरते व त्यामुळे फळगळ होऊन एकंदरीत उत्पादनात घट येऊ शकते. म्हणून उच्च तापमानापासून संरक्षण म्हणून फळबागेत सेंद्रिय आच्छादनांचा वापर करावा. वाढत्या तापमानाची कक्षा लक्षात घेऊन कांदा पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे तसेच ओलीत करतेवेळी ते प्राधान्याने सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेत करावे. पिकांच्या व्यवस्थापनाकरीता तसेच उष्णतेच्या लाटेपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी भारतीय हवामान विभागाच्या वेबसाईट https://mausam.imd.gov.in वर हवामानाविषयी अद्यावत माहिती घेत राहावी, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

## बेपत्ता बालिकेचा मृतदेह तीच्या घरातच सापडला



**दि.२७, पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीला खेटून असणा-या देवीचापाडा गावात राहणारी दोन वर्षांची बालिका मंगळवारी दुपारपासून बेपत्ता होती. तीच्या पालकांनी यासंदर्भातील तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात नोंदवली होती. बुधवारी रात्री घरातील पोटमाळ्यावरुन दुर्गंधी येत असल्याने शोध घेतल्यावर एका पेटीमध्ये बेपत्ता बालिकेचा मृतदेह सापडला. यामुळे देवीचा पाडा गावामध्ये एकच खळबळ माजली. अद्याप बालिकेच्या मृत्यूचे कारण स्पष्ट झाले नाही.

देवीचा पाडा येथील विनायक मेडिकल जवळील माऊली कृपा इमारतीच्या तीस-या मजल्यावर पीडित मुलीचे कुटुंब राहत होते. मंगळवारी बालिकेच्या पालकांनी तळोजा पोलिसांनी दिलेल्या तक्रारीमध्ये मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता बालिका बेपत्ता झाल्याचे म्हटले. संबंधित तक्रार नोंदवण्यासाठी पावणेपाच वाजले. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. ज्या इमारतीमध्ये हे कुटूंब राहतात त्याच्याजवळ त्यांचे काही नातेवाईक सुद्धा राहतात. या घटनेनंतर नवी मुंबई पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी घटनास्थळी गुरुवारी भेट दिली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात संबंधित कुटुंबियांच्या संपर्कात मंगळवार ते बुधवारी आलेल्यांची चौकशी पोलिसांनी सुरू केली आहे.

# बचतगटांच्या उत्पादनासाठी विक्री कैंद्र उभारणार - पालकमंत्री सावकारे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, भंडारा :** महिला आर्थिक विकास महामंडळाच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी विक्री केंद्र उभारण्यात येईल, असे पालकमंत्री संजय सावकारे यांनी गुरुवार, दिनांक २७ मार्च २०२५ रोजी सांगितले. नागपूर येथे वस्त्रोदयोग विभागातर्फे प्रस्तावित अर्बन हाटच्या धर्तीवर हे केंद्र उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविमच्या) नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उदयम विकास प्रकल्प अंतर्गत जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे उदघाटन आज पालकमंत्री श्री.सावकारे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार नरेंद्र भोंडेकर, जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य उपस्थित होते. लाल बहादूर शाळेच्या बाजूला आरसेटी प्रांगणात तीन दिवसीय बचतगटांच्या विक्री व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. आर्थिक सक्षमीकरणासाठी महिलांनी अर्थकारणात सक्रीय सहभाग घ्यावा. जिल्हयातील २ हजार ५०० माविमचे बचत गट असून ३२ हजार महिला यांच्याशी जोडल्या गेल्या आहेत. २०२४-२५ मध्ये १०३.७२ कोटी कर्जवाटप या बचतगटांना झाले असून कर्ज परतफेडीचे प्रमाण ९९ टक्के आहे. पारदर्शी आर्थिक व्यवहारामुळे महिला बचतगटांनी विश्वसनिय ग्राहक म्हणून ओळख निर्माण केली आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे श्री.सावकारे म्हणाले.



आमदार नरेंद्र भौंडेकर यांनी बचतगटांच्या माध्यमातुन महिला हस्त कौशल्यांच्या व कुशल कारीगीरीच्या अनेक उत्पादनांची मागणी करतात. ज्याला मोठी मागणी असते. हीच बाब लक्षात घेउन जिल्हास्तरावर विक्री केद्रासाठी जागेची मागणी त्यांनी यावेळी केली. या विक्री केंद्रासाठी असलेल्या जागेतूनच बचतगटांना प्रशिक्षण व त्यांच्या बैठकासाठी, कार्यक्रमासाठी हक्काचे व्यासपीठ मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांनी माविम बचतगटांच्या कामाचा आढावा घेतला.प्रास्ताविक जिल्हा व्यवस्थापक माविम संगिता भोंगाडे यांनी तर आभार उपव्यवस्थापक प्रफुल अवघड यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने बचतगटांच्या महिलांची उपस्थिती होती. यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात माविम मित्र यांचे सत्कार पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले तर महिला बचतगटांना कर्जवाटप धनादेश प्रदान करण्यात आले.

# १६ हजार ९03 घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुलांचे भूमिपूजन सोहळा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, ठाणे :** मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये '१०० दिवसांचा कृती कार्यक्रम' व 'महा आवास अभियान सन २०२४-२५' अंतर्गत राबविण्यात येत आहे. यामध्ये घरकुलांना उद्दिष्टाप्रमाणे मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना पहिला हप्ता वितरीत करणे, सर्व घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करणे हे उपक्रम समाविष्ट आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या निर्देशानुसार जिल्हयात सर्वत्र एकाच दिवशी १६ हजार ९०३ घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुलांचे भूमिपूजनाचा कार्यक्रम गुरुवार, दिनांक २७ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता सर्व ग्रामपंचायती मध्ये आयोजित करण्यात आलेला होता.

ठाणे जिल्ह्यातील केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत घरकूल योजनेंतर्गत एकूण १६ हजार ९०३ घरकुल लाभार्थ्यांचा घरकूल भूमीपूजन कार्यक्रम दि. २७ मार्च २०२५ रोजी ग्रामपंचायत स्तरावर संपन्न झाला. भिवंडी तालुक्यातील राहूर ग्रामपंचायतीमधील कुंभारपाडा येथे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते घरकूल भूमीपूजन करण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शहापूर व मुरबाड येथील ग्राम पंचायतींच्या घरकूल भूमीपूजनास भेट दिली.



कल्याण तालुक्यातील घोटसई ग्राम पंचायतीमध्ये घरकुल भूमीपूजन कार्यक्रम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांचे उपस्थितीत पार पडला. त्याअनुषंगाने जिल्हयात सर्वत्र ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण गृह निर्माण अभियंता, ग्राम पंचायत अधिकारी व स्थानिक लोक प्रतिनिधी यांच्या सहभागाने घरकूल भूमीपूजन कार्यक्रम राबविण्याबाबत ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सर्व गट विकास अधिकारी यांना निर्देश दिले व घरकूल भूमीपूजन कार्यक्रमांमध्ये लोक प्रतिनिधी, ग्रामस्थ, लाभार्थी यांना मोठ्या प्रमाणात सहभागी करुन घरकूल भूमीपूजन कार्यक्रम राबविण्यात यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले होते.

ठाणे जिल्हयातील सर्व तालुक्यात गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामपंचायतींमधील लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामस्थ व लाभार्थी यांच्या उपस्थितीत भूमीपूजन सोहळा पार पडला. जिल्हयात सर्वत्र ग्रामपंचायत स्तरावर ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली आहे.

## मंत्रालयात ऑनलाईन ॲपद्वारे मिळणार प्रवेश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** मंत्रालय सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यात चेहरा ओळख आधारित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आली. तसेच टप्पा २ अंतर्गत प्रवेशासाठी व्हीजीटर मॅनेजमेंट सिस्टीम प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मंत्रालयात क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, अभ्यागत यांना यापुढे कोणत्याही कामाकरीता प्रवेश हवा असल्यास त्यांना'डिजीप्रवेश'या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारे मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे. अभ्यांगतांना मंत्रालयाच्या ज्या विभागात कामानिमित्त प्रवेश आवश्यक आहे. केवळ त्यांना दिलेल्या वेळेत आणि अनुज्ञेय असलेल्या मजल्यावरच प्रवेश करावा. अनधिकृत मजल्यावर प्रवेश केल्यास अभ्यागत कारवाईस पात्र राहतील. अभ्यागतांनी संबंधित विभागातील आपले काम पूर्ण झाल्यावर विहीत वेळेत मंत्रालयातून बाहेर पडावे. ज्येष्ठ नागरीक



व दिव्यांग अभ्यागतांना रांगेत उभे राहण्यामुळे होणारा त्रास विचारात घेता त्यांना दुपारी १२ वाजता प्रवेश देण्यात येईल. तर दुपारी १२ नंतर ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांच्यासाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था राहील. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांनी तत्संबंधीचे वैध प्रमाणपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.

मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना दुपारी २ वाजेनंतर प्रवेश देण्यात येईल. अशा प्रवेशासाठी त्यांना डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येईल. अभ्यागतांनी मंत्रालयात प्रवेश मिळविण्यासाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड आदी शासन मान्य ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यांताकरीता गार्डन गेट येथे ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेश नोंदणीकरीता तसेच मदतीकरीता एक खिडकी उपलब्ध असणार आहे. ड'डिजीप्रवेश' ॲपद्वारे आपली नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या क्यू आर कोड आधारे मंत्रालयाबाहेर असलेल्या खिडकीवर मंत्रालय प्रवेशाकरिता आरएफआयडी कार्ड वितरीत करण्यात येईल. हे आरएफआयडी कार्ड आधारे सुरक्षाविषयक तपासणी करून मंत्रालयात प्रवेश देण्यात येईल. अभ्यागतांना आरएफआयडी प्रवेश ओळखपत्र परिधान करणे व मंत्रालयातून बाहेर जाताना ते सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे जमा करणे बंधनकारक राहील.

## नवी मुंबई महानगरपालिकेत १.५० लाखाहून अधिक संचिकांचे वर्गीकरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** शासकीय व निमशासकीय कार्यालयांत मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पने नुसार राबविण्यात येत असलेल्या १०० दिवसांच्या ७ कलमी कृती आराखडयानुसार कालबद्ध कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे हे सातत्याने आढावा घेत असून नवी मुंबई महानगरपालिकेतील प्रत्येक विभागामार्फत सात कलमांनुसार करण्यात येत असलेल्या सुनियोजित व गतिमान कार्यवाहीकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे.यामधील प्रत्येक विभागाने अंमलबजावणी करावयाचा महत्वाचा भाग म्हणजे कार्यालयातील स्वच्छता व सोयी – सुविधा हा असून या अनुषंगाने सर्वच विभागप्रमुखांना व कार्यालय प्रमुखांना मार्च अखेरपर्यंत कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सर्वच विभागांमध्ये अभिलेख वर्गीकरण व जतन याबाबतचे प्रचलित नियम व कार्यपध्दती प्रमाणे निंदणीकरण,



नष्टीकरण व निर्लेखन प्रक्रिया प्राधान्याने राबविण्यात येत आहे.या अंतर्गत प्रत्येक विभागातील कागदपत्रे व नस्ती यांचा अभिलेख प्रामुख्याने निंदणीकरण करुन तपासणीअंती त्यामधील आवश्यकता नसलेली कागदपत्रे विहित नियमावलीनुसार नष्ट करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे जतन करुन ठेवायचा अभिलेख जतन करावयाच्या कार्यपध्दतीनुसार 'अ, ब, क आणि ड' अशा चार प्रकारात सर्व बाबींच्या नोंदी घेऊन वर्गीकरण करण्यात येत आहेत.या बाबींच्या तपासणीकरीता महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार प्रशासन विभागामार्फत तपासणी समिती गठीत करण्यात आल्या असून हे समिती सदस्य विविध विभागांमध्ये भेटी देऊन या अनुषंगाने सुरु असलेल्या कामकाजाची पाहणी करत आहेत.

महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये प्राधान्याने अभिलेख निंदणीकरणाचे वर्गीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून आतापर्यंत २ लाख ५० हजार ४७१ संचिकांचे 'अ, ब, क, ड' अशा चार प्रकारांत वर्गीकरण करण्यात आलेले आहे.अभिलेख वर्गीकरण व जतन याविषयी प्रशासन विभागामार्फत सत्यजित बडे यांचे व्याख्यानही आयोजित करण्यात आले होते. अभिलेख विषयक कार्यवाहीत सुसूत्रता व समानता आणण्यासाठी हे व्याख्यान लाभदायक ठरले आहे.

अभिलेख निंदणी करणाप्रमाणेच कार्यालयातील विद्यमान दप्तर सहा गठ्ठे पध्दतीनुसार ठेवण्याची कार्यवाही देखील केली जात आहे. तसेच कार्यालयातील अंतर्गत स्वच्छतेवर व परिसर स्वच्छतेवर भर देण्यात येत आहे.

कार्यालयामधील जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विहित कार्यपध्दतीने विल्हेवाट लावण्याची कार्यवाही देखील करण्यात येत आहे. त्यासोबतच कार्यालयामध्ये सुसज्ज प्रतिक्षालयाची व्यवस्था, पिण्याच्या स्वच्छ व शुद्ध पाण्याची व्यवस्था, स्वच्छ प्रसाधनगृहांची व्यवस्था, सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलकांची व्यवस्था व वातावरण प्रसन्न आणि आल्हाददायक राहील अशाप्रकारे सुशोभिकरण व्यवस्था करण्यात येत आहे. १०० दिवसांच्या कृती आराखड्यानुसार कार्यालयीन कागदपत्रांसह सर्व अभिलेखाचे नियमांनुसार वर्गीकरण व जतन कार्यवाही करण्यासोबतच कार्यालयीन स्वच्छता व लोकाभिमुख सुविधा पूर्तता यामुळे कार्यालयांचे स्वरुप आता बदललेले प्रसन्न दिसून येत आहे.

## थोडक्यात

### गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी, हनुमान जयंती सणासाठी रूट मार्च चे आयोजन

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२७, कल्याण (ठाणे) :** आगामी गुढी पाडवा, रमजान ईद, राम नवमी, हनुमान जयंती सण उत्सवाच्या अनुषंगाने रूट मार्च चे आयोजन करण्यात आले होते. सदर रूट मार्च महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन हद्दीतील सदानंद चौक काळी मशीद या ठिकाणावरून सुरू होऊन पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीत प्रवेश करून पुढे केडीएमसी मुख्यालय – शंकरराव चौक – आचार्य अत्रे नाट्यगृह – घेला देवजी चौक – गांधी चौक – दूध नाका – पारनाका – लालचौकी– दुर्गामाता चौक – दुर्गाडी मंदिर – वाय जंक्शन येथे यु टर्न घेऊन दुर्गाडी मंदिर या ठिकाणी पोहोचून रूट मार्च समाप्त झाला. सदर रुट मार्च करिता पो.उप.आयुक्त अतुल झेंडे. सपोआ. कल्याणजी घेटे यांचे सह महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, खडकपाडा पोलीस स्टेशन व बाजारपेठ पोलीस स्टेशन चे ५ पोनि,१० सपोनि/ पोउपनि,व ७७ अंमलदार तसेच SRPF चे ०१ अधिकारी ११ अंमलदार. ०३ पिटर मोबाईल, ०१ CRM मोबाईल, वरून मोबाईल सह सहभागी झाले होते.



### दापोडी शाळेतील कु.श्रेयश खोडवे नवोदय परीक्षेत पात्र

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, दौंड (पुणे) :** दौंड तालुक्यातील दापोडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी कु.श्रेयश संतोष खोडवे याने खुल्या प्रवर्गातून नवोदय परीक्षेत यश मिळवले. तालुक्यातुन नवोदय विद्यालय पिंपळे जगताप येथे प्रवेशासाठी पात्र ठरला आहे. जवाहर नवोदय या परीक्षेत जिल्ह्यातून फक्त ८० मुलांची निवड केली जाते.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना बारावीपर्यंतचे मोफत शिक्षण दिले जाते. दापोडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता अतिशय उत्तम असून शिष्यवृत्ती परीक्षेतही दरवर्षी शाळेचा निकाल चांगला असतो. त्यामुळे गुणवत्तेचा उत्तम दर्जा ठेवणाऱ्या दापोडी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांचे विशेष कौतुक होत आहे. या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या वर्गशिक्षिका पुष्पा किशोर चव्हाण यांनी योग्य नियोजन करून जादा तास व प्रश्नपत्रिकांचा सराव घेतला. तसेच शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र फणसे, केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीम.लता हिंगणे, विस्तार अधिकारी सुनील घुमरे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. दौंड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, शाळा व्यवस्थापन समिती तसेच समस्त ग्रामस्थ दापोडी यांनी कु. श्रेयश याचे कौतुक केले.



## प्रत्येक नागरिकाला प्रगतीचे पंख देण्याची क्षमता संविधानात; मुख्यमंत्री यांचे गौरवोद्गार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, ठाणे :** भारताचे संविधान हे जगात सर्वोत्तम आहे. भारताचे २०४७ मध्ये विकसित देशाचे स्वप्न साकारवयाचे आहे. ही स्वप्नपूर्ती करण्याची क्षमता संविधानात असून देश संविधानाने दिलेल्या मार्गावर चालत आहे. संविधानाने सामाजिक, आर्थिक, राजकीय क्रांती आणली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बनविलेल्या संविधानामुळे रक्त विरहीत क्रांती देशात झाली. या संविधानात प्रत्येक भारतीयाला प्रगतीचे पंख देण्याची क्षमता आहे, असे गोरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत काढले. भारतीय संविधानाच्या ७५ वर्ष गौरवशाली परंपरेच्या चर्चेमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी सहभाग घेत मनोगत व्यक्त केले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शासनाच्यावतीने ४३४ औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये संविधान मंदीर स्थापन करण्यात आले आहेत. मूल्यशिक्षणात संविधानाची मूल्ये शिकविण्यात येणार आहेत. प्रत्येक तालुक्यात संविधान भवन बांधण्यात येणार आहे. उच्च भारतीय मुल्यांचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान तयार केले आहे. भारत जगातली पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाली आहे, लवकरच जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार आहे.

लंकेतील सीतेची सुटका, गीतेचा उपदेश आणि बुद्धाचे तत्त्वज्ञान संविधानात आहे. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत भारताचे संविधान कुणीही बदलू शकणार नाही. त्यामुळे संविधानाला कोणताही धोका नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.देशाला स्वातंत्र्य देण्यासाठी इंग्रजांनी त्या काळात भारतात कॅबिनेट मिशन पाठविले. या कॅबिनेट मिशनमध्ये तीन मंत्री होते. या कॅबिनेट मिशनने भारताला स्वतंत्र करण्यासाठी भारताचे स्वत:चे संविधान असायला पाहिले, असा अहवाल दिला आहे. भारतीय नेतृत्वाशी चर्चा करून संविधान सभा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत सरकार १९३५ चा कायदा करण्यात आला. संविधान सभेने एकेका कलमावर, शब्दावर चर्चा केली आहे. सभेने १६५ दिवस ११ तास काम केले. या सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी



झाली तर शेवटची बैठक २४ जानेवारी १९५० रोजी झाली. तसेच २६ नोव्हेबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले, तर २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अंमलात आणले.जगात सर्वाधिक प्रदीर्घ काळ संविधान निर्मितीचे काम भारतीय संविधान सभेने केले आहे. सभेमध्ये ३८९ सदस्य होते, त्यापैकी २९२ सदस्य प्रोव्हेंशनस असेम्बंली मधून निवडून आले होते. ९२ सदस्य हे संस्थानचे होते, ४ जण चिफ कमिशनर कॉन्सीट्युएन्सीमधून निवडून आले होते. संविधान सभेचे पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली, या अधिवेशनाची सुरूवातही वंदे मातरमने झाली होती. संविधान सभेने मसुदा लेखन समिती तयार केली. या समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.

या मसुदा समितीने अंतिम मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ रोजी सादर केला. संविधान लागू करताना संविधानात उद्देशिका, २२ भाग, ३९५ कलमे होती. आता संविधानात २५ भाग, ४४८ कलमे, १२ परिशिष्ठ आहेत. मसुदा वेळी ७ हजार ६३५ सुधारणा सुचविण्यात आल्या होत्या, त्यापैकी २ हजार ४७३ सुधारणा स्वीकारण्यात आल्या.

संविधानात आतापर्यंत १०६ घटना दुरूस्त्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये १०६ वी दुरूस्ती महिलांना संसदेत व विधानसभेत ३३ टक्के आरक्षणाची आहे.संविधानातील उद्देशिका आपली आहे. आम्ही भारतीय लोक सांगतो, म्हणून हे जोपासण्याची जबाबदारी आपली आहे. पाश्चिमात्य देशातील हे संविधान नाही. ठिकठिकाणी बंधुता हे शब्द दिसतात. हे गौतम बुद्धांचे तत्वज्ञान आहे. संधीची समानता त्यांनी दिली. जात, धर्म यांच्या आधारे संधी दिली जाणार नाही. सर्वांना समान संधी दिली जाईल. लंकेतील सीतेची सुटका देखील संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये दाखवलेली आहे. ती यासाठी दाखवलेली आहे, की आम्हाला या संविधानाचा नारी सन्मानासाठी वापर करायचा आहे, हे त्यातून अभिप्रेत करण्यात आलेले आहे. गीतेचा उपदेश देखील याच संविधानात दाखवला आहे. या तत्त्वावर उभे राहिलेले हे संविधान आहे. या संविधानात सर्वात मोठी ठेव ही लोकशाही आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. भारतीय जीवन पद्धत ही संविधानाचा आत्मा आहे असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, महात्मा गांधी नेहमी म्हणायचे रामराज्य आणायचे आहे. राजा जेव्हा भेदभाव करत नाही, त्याला रामराज्य म्हणतात.

समाजातील छोट्या छोट्या लोकांना एकत्रित करून त्यांना शक्ती राजा देतो. त्याला रामराज्य म्हणतात. हे पूर्णतः भारतीय मूल्यांवर तयार केलेले संविधान आहे. अशोक चक्र हे कायद्याचे व धर्माचे चक्र आहे. धर्म हे सातत्याने पुढे जाणारे गतीमान चक्र आहे. काळाच्या बरोबर चालण्याचे धैर्य दाखवले नाही, तर आपण पुढे जाऊ शकत नाही. भारतीय जीवन पद्धत ही संविधानाचा आत्मा आहे.

संविधानाने मुलभूत हक्क बहाल केले आहेत. कायद्यासमोर समानता आहे. धर्म, भेद यावरून भेदभाव करता येणार नाही. सामाजिक समानता, समान संधी, कलम १५ मध्ये भेदभाव करता येणार नाही, असे बाबासाहेबांनी सांगितले आहे. पण एखादा समाज जर मागे राहिला असेल तर शैक्षणिक आरक्षण तरतूदही केली आहे. संविधानाने सर्वांना संधीची समानता दिली आहे. प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा समान आहे. कुठल्याही व्यक्तीला जात, पंथ, धर्म या आधारावर संधी मिळणार नाही. प्रत्येकाची प्रतिष्ठा राहीली पाहिजे, असा प्रयत्न डॉ. बाबासाहेबांनी संविधानात केला आहे. संविधानातून राजकीय लोकशाही नको, सामाजिक, आर्थिक लोकशाही आली पाहिजे, असे डॉ.बाबासाहेब सांगायचे, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. भारतीय संविधानाने पहिल्या दिवसापासून मतदानाचा अधिकार दिला आहे.

भारत एक संघराज्य प्रणाली आहे. हे राज्य सांस्कृतिक एकतेवर अवलंबून आहे. कार्यपालिका, न्यायपालिका, विधीपालिका हे तीन स्तंभ भारतीय लोकशाहीचे आहे. तर अदृश्य स्तंभ हा प्रसार माध्यमे आहे. संविधानात राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे दिली आहे. या तत्वानुसार समान नागरी कायदा करण्याची जबाबदारी प्रत्येक राज्यावर दिली आहे. नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप समान नागरी संहिता लागावी, यासाठी राज्य प्रयत्नशील राहील, असेही या तत्वानुसार नमूद केले आहे. पशु, जनावरे यांच्या कत्तलीस मनाई करण्याचे तत्वही राज्य धोरण मार्गदर्शक तत्वामध्ये आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संविधानाची ७५ वर्ष गौरवशाली परंपरेच्या चर्चेत सहभाग घेत मनोगतानंतर सदस्य भास्कर जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संविधानावरील विधानसभेतील भाषण पुस्तक रूपात प्रकाशित करीत पुस्तक सर्वांना उपलब्ध करून देण्याची मागणी केली. ही मागणी विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी मान्य करीत मुख्यमंत्री यांचे भाषण पुस्तक रूपातच नव्हे, तर डिजिटल स्वरूपातही वितरित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### बेशिस्त रिक्षाचालकांविरुध्द राजकीय पक्षही आक्रमक

**दि.२७, नाशिक :** शहरात रिक्षाचालकांची बेशिस्ती अधिक प्रमाणात वाढल्याने तसेच त्यांच्या बेशिस्तीचा त्रास इतर वाहनधारकांना होऊ लागल्याने त्यांच्याविरोधात अखेर शहरातील राजकीय पक्षही मैदानात उतरले आहेत. मागील आठवड्यात बेशिस्त रिक्षाचालकाने एका मोटार चालकाला मारहाण केल्याचे प्रकरण गाजल्यानंतर वाहतूक पोलीस सक्रिय झाले आहेत. ठिकठिकाणी रिक्षाचालकांना शिस्त लागावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. रिक्षाचालकांची अरेरावी, बेशिस्ती टोकाला पोहचली असतानाही शहरातील एकाही राजकीय पक्षाने त्याविरुध्द आवाज उठविला नसताना आता राष्ट्रवादी युवक काँग्रेसने (अजित पवार) पुढाकार घेतला आहे. गर्दीच्या ठिकाणी बेशिस्त रिक्षाचालक आणि शहर बससेवा सिटीलिंकचे चालक प्रवाशांशी हुज्जत घालतात. वाहतुकीच्या नियमांचे पालन करत नसल्याने त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी सहायक पोलीस आयुक्त पद्मजा बढे यांच्याकडे केली आहे. निवेदनात खैरे यांनी भूमिका मांडली आहे. नाशिक शहराचा झपाट्याने विकास होत असताना वाहनधारकांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होत आहे. वाहतूक नियम न पाळणे हा मुद्दा प्रामुख्याने नेहमी जाणवत असतो. रिक्षाचालकांची इतर वाहनधारकांशी हुज्जत आणि रिक्षाचालकांची अरेरावी हा विषय शहरात नित्याचाच झाला आहे. शहरात चौकाचौकांमध्ये वाहतूक सुरळीत व्हावी तसेच अपघात टाळण्यासाठी सिग्नल बसविण्यात आले आहेत. परंतु, रिक्षाचालक आणि सिटीलिंक बसचालक सिग्नल नियमांचे पालन करताना दिसत नाहीत, अशी तक्रार निवेदनात करण्यात आली आहे.